पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८
मा.क्रिडा समिती
कार्यपत्रिका क्रमांक :- ११

**सभावृत्तांत**

दिनांक :- १७ / १० / २०१२ वेळ :- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक १७/१०/२०१२ रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. थोरात वनिता एकनाथ - सभापती
२) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. बोकड रामदास गेणभाऊ
५) मा. मोरेश्वर महदू भोंडवे

याशिवाय मा.मोरे - प्र.उपनगरसचिव, मा.भंडलकर-प्रशासन अधिकारी, मा.पानसरे - क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

खालील प्रमाणे सूचना मांडणेत आली-

सूचक :- मा.रामदास बोकड अनुमोदक :- मा.वैशाली काळभोर

सोमवार दिनांक २२/१०/२०१२ रोजी दुपारी ४.०० पर्यत सभा तहकूब करणेत यावी.
सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

-----------

मा.सभापती :- सोमवार दिनांक २२/१०/२०१२ रोजी दुपारी ४.०० पर्यत सभा तहकूब करणेत येत आहे.

**[ थोरात वनिता एकनाथ ]**
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड मनपा, पिंपरी १८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८
मा.क्रिडा समिती
कार्यपत्रिका क्रमांक :- ११

**<u>सभावृत्तांत</u>**

(दिनांक १७/१०/२०१२ ची तहकूब सभा )

दिनांक :- २२ / १० / २०१२ वेळ :- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची दिनांक १७/१०/२०१२ ची तहकूब सभा सोमवार दिनांक २२/१०/२०१२ रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. थोरात वनिता एकनाथ - सभापती
२) मा.पांढरकर निलेश शंकरराव
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. बोकड रामदास गेणभाऊ
५) मा. अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार

याशिवाय मा. माछरे - विशेष अधिकारी, मा. चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.भंडलकर - प्रशासन अधिकारी, मा.पानसरे - क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**दिनांक २०/०९/२०१२ व ०३/१०/२०१२ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक १०) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले .**

----------

ठराव क्रमांक :- २४ विषय क्रमांक :- १
दिनांक :- २२/१०/२०१२ विभाग :- क्रिडा
सुचक :- मा. रामदास बोकड अनुमोदक :- मा. संपत पवार
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.क्रिडा/४/कावि/४०३/२०१२, दि. १/१०/२०१२

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ३६ व्यायामशाळा सेवाशुल्क देऊन सार्वजनिक संस्था / मंडळांना चालविणेस दिल्याचा करार प्रस्तावात रकाना क्र.४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे संपुष्ठात येत असल्याने रकाना क्र.५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मुदतवाढ देणेस व रकाना क्र.६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सेवाशुल्क देऊन

सदरच्या व्यायामशाळा कराराने देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**[ थोरात वनिता एकनाथ ]**
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड मनपा, पिंपरी १८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/४/कावि/ १३८५ /२०१२
दिनांक :- २३/१०/२०१२ चे लगत

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\१७२.१६.०.६८\e\e drive\Nagersachiv१\Krida ११-१२\Proceeding_११.doc